# पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी

दुरध्वनी ०२४५२—२३३३७५

**जाहीर लिलाव**

या महाविद्यालयाची जुनी असलेली वाहने टाटा सुमो जीप (MH-22/D-7091), पशुरूग्णवाहीका (MH-22/0552), ट्रक्टर (MH-22/B-6257) वाहने जाहीर लिलावाव्दारे विक्री करण्या बाबतची सुचना विद्यापीठ संकेतस्थळावर (www.mafsu.in) अटी, शर्ती, व नियमावलीसह सविस्तर प्रकाशीत करण्यात आली असून सदर वाहनाचा जाहीर लिलाव दि. ११/०२/२०१९ रोजी महाविद्यालयात सकाळी ११.०० वाजता करण्यात येणर आहे. सदरील लिलावात सहभागी होण्यासाठी आवश्यक असणारी मात्र प्रत्येक वाहनासाठी वेगवेगळी आवेदन पत्रे संबंधीतांना दि. २८/०१/२०१९ पासून दि. ०५/०२/२०१९ पर्यंत महाविद्यालय कार्यालयातून भांडारपाल यांचे कडून रोख रू. ५००/— रूपये पाचशे रोख व्दारे प्राप्त करता येतील आणि आवेदन पत्रे भरून दि. ०६/०२/२०१९ पर्यत सादर करणे अनिवार्य आहे.

जा.क्र : व्हिसीपी—१/वानि/५३३५/२०१९
दि. : २२/०१/२०१९

**सहयोगी अधिष्ठाता**

# पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी

**(महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापिठ नागपूर अंतर्गत)**

**प्रपत्र—अ**

**कामाचे नाव** : महाविद्यालयाची जुनी पशुरूग्णवाहीका एमएच २२/०५५२ ची जशी आहे त्या स्थितीत जाहीर लिलावव्दारे विक्री करणे.

| अ.क्र. | वाहनाचा तपशील | संख्या |
|---|---|---|
| १. | महाविद्यालयाची जुनी पशुरूग्णवाहीका क्र. एमएच २२/०५५२ ची जशी आहे त्या स्थितीत आणि आहे त्या ठिकाणाहून जाहीर लिलावाव्दारे विक्री<br>१.कंपनी — टाटा ४०७    २. वर्ग — पशुरूग्णवाहीका<br>३. इंजिन — डिझेल    ४. रंग — पांढरा<br>५. कर — ४५०+ १६    ६. उत्पादन वर्ष — १९९५ | एक (१) |

—स्वाक्षरीत—

**सहयोगी अधिष्ठाता**
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय,
परभणी यांची सही, शिक्का दिनांक

# पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी

जा.क्र. : व्हिसीपी—१/वानि/५३३५/२०१९
दि. : २२/०१/२०१९

**जाहिर निविदा**
महाविद्यालयाची जुनी असलेली वाहन तीन (०३) जशी आहे त्या स्थितीत
जाहिर लिलावाव्दारे विक्री सुचना

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी येथील जुनी असलेली, टाटा सुमो जीप (MH-22/D-7091), पशुरूग्णवाहीका (MH-22/0552), ट्रक्टर (MH-22/B-6257), जशी आहे त्या स्थितीत जाहिर लिलावाव्दारे विक्री करावयाची आहे. त्यासाठी इच्छुक व्यक्ती/संस्था यांनी जाहीर लिलावात भाग घेण्यासाठी रोख रू. ५००/— (रूपये पाचशे) ना परतावा अटीवर व्दारे या कार्यालयातून भांडारपाल यांचेकडून हस्तगत करता येईल. प्रत्येक वाहनासाठी ना परतावा रक्कम वेगवेगळी भरणे आवश्यक आहे. सदरील निविदा संबंधाने अटी, शर्ती व नियम विद्यापिठ संकेतस्थळ (www.mafsu.in) वर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | विवरण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | निविदा विक्री रोख रू.५००/— किंवा राष्ट्रीयकृत बॅकेचा धनाकर्ष/बॅकर्स चेकव्दारे परतावा अटीवर उपलब्ध | २८/०१/२०१९ ते ०५/०२/२०१९ | कार्यालयीन कामाच्या वेळेत |
| २. | निविदा आवेदन पत्र भरून रू. २०,०००/— चा राष्ट्रीयकृत बॅकेचा धनाकर्ष/बॅकर्स चेक अनामत रक्कम म्हणून जमा करणे. प्रत्येक वाहनासाठी वेगवेगळी रक्कम आवश्यक | ०६/०२/२०१९ | कार्यालयीन कामाच्या वेळेत |
| ३. | बंद आणि नादुरूस्त स्थितीत असलेले वाहन अवलोकनाचा/पाहणी करण्याचा कालावधी | २८/०१/२०१९ ते ०७/०२/२०१९ | कार्यालयीन कामाच्या वेळेत |
| ४. | वाहनाचा जाहीर लिलाव | ११/०२/२०१९ | सकाळी ११.०० वाजता |

—स्वाक्षरीत—
**सहयोगी अधिष्ठाता**

# पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी

**(महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापिठ नागपूर अंतर्गत)**

**जाहीर निविदा मागविण्यासंबंधी अटी, शर्ती व नियम**

**प्रपत्र—क**

१) निवीदा आवेदन पत्रासोबत Pay & Accounts Officer, COVAS, Parbhani यांच्यानावे अनामत रक्कम रू. २०,०००/— (रूपये वीस हजार) एवढया अनामत रक्कमेचा राष्ट्रीयकृत बॅकेचा धनाकर्ष/बॅकर्स चेक जोडणे आवश्यक आहे.

२) आवेदन पत्रावर वर्तमापत्रात दिलेल्या जाहीरातीचा जावक क्रमांक व दिनांक नमूद करणे आवश्यक आहे.

३) अनामत भरलेल्या व्यक्तीलाच लिलाव प्रक्रियेत सहभाग घेता येईल. केवळ अनामत रक्कमेची प्रदान केलेली महाविद्यालयाची पावती असलेल्या व्यक्तीसच लिलावगृहात प्रवेश दिला जाईल. लिलावात सहभागी होण्यासाठी अनामत रक्कम भरणा केल्या बाबतची महाविद्यालयाची मूळ पावती सोबत आणणे बंधकारक राहील.

४) विक्रीसाठीची बोली या महाविद्यालयाने ठरविलेल्या न्यूनतम रक्कमेपेक्षा जास्त असणे बंधनकारक राहील.

५) विक्रिसाठी अपेक्षित रक्कम न मिळाल्यास लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी यांना राहील. तसेच जाहीर लिलाव प्रक्रिये दरम्यान कोणत्याही हरकतीवर निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष, लिलाव समिती यांना राहील. तथापी अंतिम निर्णयाचा अधिकार सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी यांना राहील.

६) लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ज्या व्यक्ती/संस्थेची बोली जास्त असेल त्यांना वाहनाची संपूर्ण लिलाव रक्कम भरल्यानंतर, स्वखर्चाने सदरील वाहन घेवून जाणे बंधनकारक राहील.

७) सर्वोच्च दर दिलेल्या व्यक्तीस वाहनाची ठरलेली रक्कम दि. १२/०२/२०१९ पर्यंत रोखीने महाविद्यालयाकडे दुपारी ०२.०० वाजेपर्यंत जमा करावी लागेल.

८) लिलावाव्दारे विक्री झालेले वाहन सदरील व्यक्तीने न घेऊन गेल्यास प्रती दिन रू. ५००/— (रूपये पाचशे) ऐवढा दंड भरावा लागेल. असा दंड दि. १३/०२/२०१९ पासून पुढील दहा दिवसासाठी लागू राहील. तदनंतर मात्र वाहन हस्तांतरीत केले जाणार नाही तसेच अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

९) वाहन आहे तशा स्थितीत आणि उभे असलेल्या ठिकाणावरून आहे तसे व तेथून ताब्यात घेणे बंधनकारक असेल.

१०) जास्तीत जास्त रक्कमेची बोली लावणाऱ्या व्यक्तीस/संस्थेस लागू असलेल्या अटींची पूर्तता करून वाहन विक्री केली जाईल.

११) सदरील वाहनाची सरकारी अपेक्षित रक्कम जाहीर लीलावाच्या दिवशी दि. ११/०२/२०१९ रोजी घोषीत करण्यात येईल.

१२) निविदा भरणाऱ्याने/जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या इच्छुकाने कार्यालयीन वेळेत वाहनाची स्वत:पाहणी करून खात्री करून घ्यावी.

१३) हा जाहीर लिलाव आवेदनपत्र स्विकृत तारखेपासून जास्तीतजास्त ९० दिवसापर्यंत ग्राहय धरण्यात येईल.

१४) सदरील वाहन कार्यालयीन परवानगी घेवून कामाच्या वेळेत पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाच्या तापसणी/पाहणीसाठी उपलब्ध करण्यात येईल.

१५) जाहीर लिलावाच्या दिनांकानंतर वाहनाची संपूर्ण जबाबदारी (कर, विमा, स्थानिक कर, वाहतूक, जकात इ.) वाहन खरेदी करणाऱ्याचीच असेल.

१६) जाहीर लिलावाची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कोणतेही व्याज अदा न करता सर्व सहभागार्थीचे अनामत रक्कमेचे (रू. २०,०००/—) व लिलावातील आवेदनपत्रासोबत भरेलेले रू. २०,०००/— चे धनाकर्ष/ बॅकर्स चेक लिलावा नंतर लगेच परत केले जातील. मात्र असे धनाकर्ष/बॅकर्स चेक लिलावानंतर २४ तासाच्या आत परत घेणे बंधनकारक राहिल.

१७) आवेदनपत्र भरणाऱ्या व्यक्तीने सदर आवेदन पत्राच्या प्रत्येक पृष्ठावर स्वाक्षरी करून शिक्का मारणे आवश्यक आहे. नसता आवेदन पत्र स्विकारले जाणार नाही.

जा.क्र. : व्हिसीपी—१/वानि/५३३५/२०१९
दि. : २२/०१/२०१९

—स्वाक्षरीत—
**सहयोगी अधिष्ठाता**
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय,
परभणी

मी प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, मला वरील अटी व शर्ती मान्य असून मी याचे काटेकोरपणे पालन करण्याची हमी देतो.

**लिलावात भाग घेणाऱ्योच नाव व स्वाक्षरी**

संपूर्ण पत्ता पिनकोड सहीत : ............................

.................................................................

भ्रमणध्वनी क्र.............................

**दिनांक :—**

**समक्ष/साक्षीदार**

१) नाव :— ....................................सही ......................... पत्ता ................................

२) नाव :— ...................................सही ........................... पत्ता ................................